RIGHT TO INFORMATION

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१ ०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१०
फॅकस ०२२ २२०१८५३९
E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

---

जा.क्र.राआ/महा./आस्था/बदली /लले (नि.श्रे)/१९/ २८९८ दि - १७ जून , २०१९

---

संदर्भ :- १. या कार्यालयाचे आदेश क्र. राआ/महा. /आस्था/बदली/लले(नि.श्रे.)/१९/२५६३ दि. २९ मे, २०१९

२. श्री.कुंदन पी.धाडसे, लघुलेखक (नि.श्रे.), जिल्हा ग्राहक मंच, अति.नागपूर यांचे पत्र यांचे पत्र दिनांक ०१/०६/२०१९

३. प्रबंधक,जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अति. नागपूर यांचे पत्र क्र. अजिग्रामं/नाग/आस्था/कुपीधा/बदली/२०१९/३८०, दिनांक ०४/०६/२०१९

४. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर खंडपीठ यांचे O.A.No. ३७३/२०१९ (SB) मधील आदेश दिनांक ०३/०६/२०१९

## कार्यालयीन आदेश

वरील संदर्भ क्र. १ अन्वये श्री. कुंदन पी. धाडसे, लघुलेखक (नि.श्रे. ), जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अति. नागपूर यांची बदली जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अति. नागपूर येथून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, गडचिरोली येथे करण्यात आली होती.

संदर्भ क्र. २ अन्वये कुंदन पी.धाडसे, लघुलेखक (नि.श्रे.) यांनी या कार्यालयास दिलेल्या निवेदनात नमूद केले होते की, त्यांनी नक्षलग्रस्त/ आदिवासी भागात एकूण १२ वर्षे ५ महिने काम कामकाज केल्यामुळे, वरील संदर्भ क्र.१ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशाचा पुर्नविचार करण्यात यावा व सदर आदेश रद्द करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अति.नागपूर यांनी श्री.कुंदन पी.धाडसे, लघुलेखक (नि.श्रे.) यांनी बदली संदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे प्रकरण क्र.O.A.No. ३७३/२०१९ (SB) दाखल करण्यात आल्याचे या कार्यालयास कळविले आहे.

संदर्भ क्र. ४ अन्वये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी O.A.No. ३७३/२०१९ (SB) या प्रकरणात दि. ०३/०६/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशात श्री.कुंदन पी.धाडसे, लघुलेखक (नि.श्रे.)यांनी या कार्यालयास सादर केलेल्या दिनांक ०१/०६/२०१९· निवेदनाबाबत २ आठवडयात निर्णय घेण्याबाबत या कार्यालयास निर्देश दिले आहेत.

दिनांक १२/०६/२०१९ रोजी नागरी सेवा मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, श्री.कुंदन पी.धाडसे, लघुलेखक (नि.श्रे.), यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने वरील संदर्भ क्र. १ अन्वये करण्यात आलेल्या बदली आदेशात, खालील प्रमाणे अंशतः बदल करण्यात येत असून त्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | आदेशातील क्र. | लघुलेखक कर्मचा-याचे नांव | दि.२९/०५/२०१९ च्या आदेशान्वये पदस्थापना देण्यात आलेले कार्यालय | अंशतः बदलाने देण्यात आलेली पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | १० | श्री.के.पी.धाडसे | जिल्हा ग्राहक मंच, गडचिरोली | जिल्हा ग्राहक मंच, हिंगोली येथील रिक्त पदावर (बदलीपात्र) |

सदर आदेश या कार्यालयाच्या www.grahak.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त कर्मचा-यांना कार्यमुक्त करणे अथवा हजर करुन घेण्याबाबत संकेत स्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

वरील कर्मचा-यांना त्यांच्या पदस्थापितीच्या ठिकाणी रुजु होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.

14/6/19

(एम.पी.भावसार)
प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग
महाराष्ट्र, मुंबई

14/06/19

प्रति,

श्री.के.पी.धाडसे, लघुलेखक (नि.श्रे.), जिल्हा ग्राहक मंच, अति. नागपूर

प्रतिलिपीः-

१. प्रबंधक (विधी), राज्य आयोग परिक्रमा खंडपीठ नागपूर/औरंगाबाद
२. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,अति. नागपूर, गडचिरोली, हिंगोली
३. जिल्हा कोषागार कार्यालय मार्फत संबंधित जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,
४. वैयक्तिक नस्ती